| पोलीस पत्रिका | पोलिस अधिक्षक | दिनांक : 16/03/2015 |
|---|---|---|
| कमांक 11 | लोहमार्ग नागपूर | 20/03/2015 |

कमांक : पोअलोना/आस्था–4/गॅझेट/3911 /2015 नागपूर दिनांक 30 /04/2015

भाग–1

कायमस्वरुपी आदेश

भाग–2

रजा

कमांक : पोअलोना/आस्था–1/सिक कालावधी/2488/2015 नागपूर दिनांक 18/03/2015

–: आदेश :–

खालील नमुद कर्मचा–यांचा सिक कालावधी वैद्यकीय कारणास्तव खालील नमुद रजेत मंजुर करण्यात येत आहे.

| अ क्र | पो.कर्म.चे नाव /हुद्दा | नेमणुक | सिक कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/379 रमेश मोहेकर | नांदेड | दि. 02.02.14 ते दि. 18.02.14 पर्यंत | 17 दिवस अर्जित रजा |
| 2 | पोशि/380 शैलेष शेगांवकर | नांदेड | दि. 09.05.14 ते दि. 08.06.14 पर्यंत | 31 दिवस अर्जित रजा |
| 3 | पोशि/527 आशिष मोहोड | नांदेड | दि. 20.03.14 ते दि. 05.04.14 पर्यत | 17 दिवस अर्जित रजा |
| 4 | पोहवा/922 संजय चौधरी | नांदेड | दि. 08.05.14 ते दि. 18.05.14 पर्यत | 11 दिवस अर्जित रजा |

कमांक : पोअलोना/आस्था–2/मपोना–295/2517/2015 नागपूर दिनांक 19/03/2015

–: आदेश :–

मपोना/295 निता तडवी, नेमणूक रे.पो.स्टे. चाळीसगांव यांचा सिक कालावधी वैद्यकीय कारणास्तव खालीलप्रमाणे रजेत मंजूर करण्यात येत आहे.

1) दि. 17/07/2014 ते दि. 21/07/2015 पर्यत 05 दिवस परावर्तित रजा
2) दि. 22/07/2014 ते दि. 13/08/2014 पर्यत 23 दिवस अर्जित रजा
3) दि. 14/08/2014 ते दि. 11/09/2014 पर्यत 29 दिवस विनावेतन रजा (रजा शिल्लक नसल्याने )

कमांक : पोअलोना/आस्था–3/पोहवा–978/ 2421/2015 नागपूर दिनांक 17/03/2015

–: आदेश :–

पोहवा/978 अविनाश नारनवरे, नेमणूक रे.पो.स्टे. अकोला यांचा सिक कालावधी खालीलप्रमाणे रजेत मंजूर करण्यात येत आहे.

1) दि. 28.04.2014 ते दि. 19.06.2014 पर्यत 53 दिवस विनावेतन रजा

कमांक : पोअलोना/आस्थापना/नेमणुक/ 2548/2015 नागपूर दिनांक 20/03/2015

संदर्भः– 1) स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग, नागपुर यांचे पत्र जा.क्र 110/2015 दि.08/01/15
2) अ.मा.वा. शाखा, लोहमार्ग, नागपुर यांचे पत्र जा.क्र 13/2015 दि.22/01/15
3) अ.मा.वा.प्रतिबंधक शाखा, लोहमार्ग, नागपुर यांचे पत्र जा.क्र 20/2015 दि.05/02/15

याद्वारे पोहवा/1036 वासुदेव जाने, नेमणुक पोलीस मुख्यालय व मपोशि/148 हेमलता नागपूरे नेमणुक पोलीस मुख्यालय (संगणक कामाकरिता) यांची नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबधं शाखा लोहमार्ग, नागपूर येथे करण्यात येत आहे.

तसेच पोहवा/483 विजय तायवाडे, व पोशि/300 विराज मते, दोन्ही नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग, हे स्थानिक गुन्हे शाख, लोहमार्ग, नागपुर येथेच काम करतील.

तसेच मसफौ/524 शिला परेलवार, व मनापोशि/784 राखी मेश्राम, दोन्ही नेमणुक महिला कक्ष हे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेत सुध्दा अतिरिक्तरित्या काम करतील.

भाग–3

## वेतनवाढ / वेतननिश्चीती / पदोन्नती

क्रमांक : पोअलोना / आस्था–1 / पोशि–68 / 2459 / 2015 नागपूर दिनांक 17 / 03 / 2015

–: सुधारित आदेश :–

पोशि / 68 विजय अरुणराव नंदनवार, नेमणुक रे.पो.स्टे. गोंदिया यांची खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चीती करण्यात येत आहे.

| विद्यमान वेतन | सुधारीत वेतन |
|---|---|
| वेतनश्रेणी रूपये 3050–75–3950–80–4590 / – | रूपये 3200–85–4900 / – |

| | |
|---|---|
| रू. 3125 / – दि. 01 / 01 / 1996<br>रू. 3200 / – दि. 01 / 12 / 1996<br>रू. 3275 / – दि. 01 / 12 / 1997<br>रू. 3350 / – दि. 01 / 12 / 1998<br>रू. 3425 / – दि. 01 / 12 / 1999<br>(दि. 19 / 06 / 2000 ते 06 / 11 / 2000 पर्यत निलंबीत)<br>(दि. 25 / 07 / 2002 ते 24 / 02 / 2003 पर्यत गु.र.नं. 16 / 2002 अन्वये निलंबीत कालावधीचा निर्णय झालेला नाही.) | रू. 3285 / – दि. 01 / 01 / 1996 (काल्पनिक)<br>रू. 3370 / – दि. 01 / 12 / 1996 (काल्पनिक)<br>रू. 3455 / – दि. 01 / 12 / 1997 (काल्पनिक)<br>रू. 3540 / – दि. 01 / 12 / 1998 (काल्पनिक)<br>रू. 3625 / – दि. 01 / 12 / 1999 (काल्पनिक)<br>(दि. 19 / 06 / 2000 ते 06 / 11 / 2000 पर्यत निलंबीत)<br>रू. 3710 / – दि. 19 / 04 / 2001 (काल्पनिक)<br>रू. 3795 / – दि. 01 / 04 / 2002 (काल्पनिक)<br>(दि. 25 / 07 / 2002 ते 24 / 02 / 2003 पर्यत गु.र.नं. 16 / 2002 अन्वये निलंबीत कालावधीचा निर्णय झालेला नाही.)<br>रू. 3880 / – दि. 03 / 11 / 2003 (काल्पनिक)<br>( निलंबीत कालावधी बगळून )<br>रू. 3965 / – दि. 01 / 11 / 2004 (काल्पनिक)<br>**(दि. 14 / 10 / 2005 पासुन गैरहजर (फरार))** |

**सुधारीत वेतनबॅन्ड रू. 5200–20200 + ग्रेड पे वेतन रू. 2000 / –**

| दिलेले वेतन | सुधारीत वेतन |
|---|---|
| (दि. 14 / 10 / 2005 ते 15 / 12 / 2009 पर्यत गैरहजर (फरार) असल्यामुळे वेतनवाढी लावण्यात आल्या नाही.)<br>रू. 6590 + 260 = 6850 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2010 | रू. 7380 + 2000 ग्रेड पे दि. 01.01.2006 (काल्पनिक)<br>दि. 14 / 10 / 2005 ते 15 / 12 / 2009 पर्यत गैरहजर असल्यामुळे दि. 16 / 12 / 2009 ला वेतनवाढ देय<br>रू. 7380 + 290 = 7670 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2010<br>(आदेश क्र. लोहमार्ग / वि.चौ / 28–सी / 3644 / 11 / दि. 30 / 04 / 2011 अन्वये दि. 14 / 10 / 2005 ते 15 / 12 / 2009 पर्यत गैरहजर (फरार) असल्यामुळे पोलीस शिपाई पदाच्या मुळ वेतनावर दोन वर्ष ठेवण्यात बाबतची शिक्षा) |
| रू. 5200 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2011<br>रू. 5200 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2012 | रू. 5200 + 2000 ग्रेड पे दि. 01.05.2011 ते 30.04.2013<br>रू. 7960 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2011(काल्पनिक) |
| रू. 5200 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2013<br>रू. 5200 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2014 | रू. 8260 + 2000 ग्रेड पे दि. 01.07.2012 (काल्पनिक)<br>रू. 8260+ 2000 ग्रेड पे दि. 01.05.2013<br>रू. 8570+ 2000 ग्रेड पे दि. 01.072013<br>रू. 8890+ 2000 ग्रेड पे दि. 01.07 2014 |

**टिप :– शासन निर्णय दिनांक 31 / 08 / 2009 नुसार काल्पनिकरित्या ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे.**

वरीलप्रमाणे करण्यात आलेली वेतन निश्चिती ही शासनाने नेमलेल्या वेतन पडताळणी पथकाचे मान्यतेचे अधिन राहुन करण्यात आली आहे. वेतन पडताळणी पथकाने सदर आदेशामुळे अतिप्रदान होत असल्याबाबत कळविल्यास त्या कर्मचा–याची पुन्हा नव्याने वेतन निश्चिती करण्यात येईल व अतिप्रदानाची रक्कम संबंधीतांचे वेतनातुन वसुल करण्यात येईल.

क्रमांक : पोअलोना/पशा–4/अंतिविधी–अनुदान/2436/2015 नागपूर दिनांक 17/03/2015

–: **आदेश** :–

बॉम्ब शोधक व नाशक पथक लोहमार्ग, नागपूर येथे नेमणुकीस असलेले सफौ/594 भारत मेश्राम हे दिनांक 26/02/2015 रोजी डयुटीवर असतांना अचानक प्रकृती खराब असल्याने ते दिनांक 27/02/2015 चे 08.05 वा पो.स्टे मधुन सिक मेमो घेंवुन खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेत असता दिनांक 17/03/2015 रोजी मरण पावले. त्यांचे अंतिधीसाठी पोलीस महासंचालक म.रा.मुंबइ यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/28.अे/4937/2012 दि.30/7/2012 अन्वये अंत्यविधी अनुदान म्हणुन रु. 10000/– (अक्षरी दहा हजार रुपये फक्त) एवढी रक्कम पोलीस कल्याण निधीतुन मंजुर करण्यात येत आहे.

सदरची रक्कम ही पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण व मा.स.वि. अधि. लोहमार्ग, नागपुर यांना अदा कनरण्यांत यावी व त्यांनी ती रक्कम संबधिताचे वारसास अदा करुन पोच पावतो या कार्यालयास आणुन सादर करावी.

क्रमांक : पोअलोना/पशा–5/सपोनि–आकरे/2418/2015 नागपूर दिनांक 16/03/2015

–: **सुचनापत्र** :–

आपण श्री. वासुदेव किसन आकरे सहा. पोलीस निरीक्षक, नेम. नियंत्रणकक्ष लोहमार्ग नागपुर येथे कार्यरत असुन आपल्या सेवा अभिलेखातील नोंदी प्रमाणे आपली जन्मतारीख दि. 23/5/1957 आहे. त्याच प्रमाणे आपले वयाला 58 वर्ष दि. 23/05/2015 रोजी पुर्ण होत आहे. करीता आपण दि. 31/0/2015 रोजी मध्यान्हानंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहे.

आपणास सुचित करण्यात येत आहे की, आपले रजेच्या खात्यामध्ये एकुण 263 दिवस अर्जित रजा व 634 दिवस अर्धवेतनी रजा शिल्लक आहेत नमुद केलेल्या अर्जित व अर्धवेतनी रजा कालावधीत यापुर्वी सिक/गैरहजर कालावधीचा निकाल लागल्यास फरक पडु शकतो.

सेवानिवृत्त वेतन प्रकरण महालेखापाल द्वितीय नागपुर यांना करावयाचे असल्याने, त्याकरीता आपण आपले पत्नीसह एकत्र असलेल्या फोटोच्या तिन प्रति व मुला मुलीचे नांव व वय (अल्पतयीन असल्यास जन्मतारखेचा दाखला आवश्यक) पेन्शन लिपीक, पोलीस अधिक्षक, कार्यालय लोहमार्ग, नागपुर यांचेकडे देण्यात यावे.

## भाग – 6

## शिक्षा

क्रमांक :– पोअलोना/आस्था–2/अं.आदेश/कसुरी/2486/2015 नागपूर दिनांक 18/03/2015

–: **आदेश** :–

संदर्भ :– पोअलोना/आस्था–2/पोना–989/कसुरी/688/2015, दिनांक 21/01/2015
कसुरदाराचे नांव :– पोना/989 प्रविण लहाणे.
नेमणुकीचे ठिकाण :– रे.पो.स्टे. शेगांव

**कसुरी :–**

सन 2014–2015 मध्ये दिनांक 15.12.2014 ते 17.12.2014 च्या रे.पो.स्टे. शेगांव येथील वार्षीक निरीक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या दप्तर तपासणीत आपल्याकडील तपासावर असलेले खालीलप्रमाणे गुन्हे व मर्गचा तपास प्रलंबित ठेवल्याचे आढळून आले आहे.

01) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 28/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :– दि. 05.05.14 चे 16.10 वा.,
मर्ग दाखल तारीख वेळ :– दि. 05.05.14 चे 16.30 वा.
घटनास्थळ :– रे.स्टे. शेगांव कि. मी. नं. 547/34 –36 जवळ डा. रेल्वे ट्रॅकवर

मयत अरुणा शामराव सुकाळे, वय 30 वर्ष, राह. शेगांव, ओळख पटली दि. 06.05.2013 रोजी सदर मर्ग मधिल मृतकाचे पी.एम. अहवाल प्राप्त झाला असुन यातील मयतांचे वडील, भाऊ, बहीण, व मृतकाचे शेजारी यांचे जाबजबाब नोंदविले असून त्याचा घेतलेला जबाबावर तारीख नमुद नाही.

तसेच तपासी अंमलदार यांनी मृतकाची आई मरण पावली आहे असे समक्ष सांगत आहे, परंतु कागदपत्रात मृतकाची आई नामे सौ. मंजुळाबाई श्यामराव गावडे, वय 60 वर्ष, धंदा घरकाम, राह. शेगांव हिचे बयाण घेवून कागदोपत्री सामील केले आहे तपासी अंमलदार हे मृतकाची आई ही घटना घडण्याचे अगोदरच मरण पावलेली आहे असे मृतकाचे इतर नातेवाईकानी सांगितले आहे तर मग आपण मृतकाच्या मरण पावलेल्या आईचा जबाब कसा काय घेतला ? सदर मर्ग मध्ये मृतकाला मरण कषाने आले आहे याचे निष्चित कारण समजुन येणेकामी मा. वैद्यकीय अधिकारी यांनी व्हिसेरा काढलेला होता, परंतु तो व्हिसेरा सी.ए. तपासणी कामी तपासी अंमलदार यांनी न पाठविता परस्पर व्हिसेरा नाष केलेला आहे.

सदर मर्ग मध्ये मृतकाची ओळख पटली आहे नातेवाईकांचे जाबजबाब घेण्यात आले आहे. पी. एम. अभिप्राय प्राप्त झाला आहे. परंतु सदर मर्गचा तपास जवळ जवळ 18 महीण्यापासुन कारण नसतांना प्रलंबित ठेवलेला आहे

उपरोक्त कसुरी बद्दल " रु. 5000/- आर्थीक दंडाची " या आशयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअलोना/ आस्था-2 /पोना-989/कसुरी/688/2015, दि. 21.01.2015 रोजी निर्गमीत करण्यात आली होती. व कारणे दाखवा नोटीस दिनांक 22/01/2015 रोजी स्विकारले. कारणे दाखवा नोटीसमधील कसूरीबाबत आपण दिनांक 09/02/2015 अन्वये मुदतीत स्पष्टीकरण सादर केलेले आहेत. सदर स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविण्यात आलेल्या शिक्षेत बदल न करता मी दिलीप झळके, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर खालील प्रमाणे आदेश देत आहे.

-: <u>अंतिम आदेश</u> :-

पोना/989 प्रविण लहाणे, यांना मु.पो. अधिनियम, ( शिक्षा व अपील ) 1956 अन्वये कलम 3 मधील तरतुदी नुसार " **रु. 5000/- आर्थीक दंडाची** " शिक्षा देण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाने आपण व्यथीत होत असल्यास सदर आदेशाविरुद्ध अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा. मुंबई यांचे कडे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे आंत या कार्यालय मार्फतीने अपील करु शकता.

क्रमांक :- पोअलोना/आस्था-2/अं.आदेश/कसुरी/2487 /2015 नागपूर दिनांक 18/03/2015

-: <u>आदेश</u> :-

संदर्भ :- पोअलोना/आस्था-2/पोना-544/कसुरी/690/2015, दिनांक 21/01/2015
कसुरदाराचे नांव :- पोना/544 रमेश जाधव.
नेमणुकीचे ठिकाण :- रे.पो.स्टे. शेगांव
**कसुरी :-**

सन 2014-2015 मध्ये दिनांक 15.12.2014 ते 17.12.2014 च्या रे.पो.स्टे. शेगांव येथील वार्षीक निरीक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या दप्तर तपासणीत आपल्याकडील तपासावर असलेले खालीलप्रमाणे गुन्हे व मर्गचा तपास प्रलंबित ठेवल्याचे आढळून आले आहे.

01) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 38/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :- दि. 06.09.14 चे 05.25 वा.,
मर्ग दाखल तारीख वेळ :- दि. 06.09.14 चे 08.30 वा.
मयत मोहम्मद शफी मोहम्मद इस्माइल, वय 85 वर्ष, राह. सिध्दीनगर, वार्ड क्र. 1, नांदुरा, जि. बुलढाणा (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये मृतकाचा मुलगा नामे शेख तनवीर शेख शफी, वय 50 वर्षे व गेटमन रेल्वे कर्मचारी यांचे जबाब घेतले आहे. पी.एम. अहवाल दि. 06.09.14 रोजी प्राप्त झाले आहे. मृतकाचे इतर नातेवाईकांचे जाबजबाब घेतले नाही. के.डा.क्र. 01 दि. 06.09.14 नंतर काही एक तपास केलेला नाही.

उपरोक्त कसुरी बद्दल " रु. 5000/- आर्थीक दंडाची " या आशयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअलोना/ आस्था-2 /पोना-544/कसुरी/690/2015, दि. 21.01.2015 रोजी निर्गमीत करण्यात आली होती. व कारणे दाखवा नोटीस दिनांक 26/01/2015 रोजी स्विकारले. कारणे दाखवा नोटीसमधील कसूरीबाबत आपण दिनांक 31/01/2015 अन्वये मुदतीत स्पष्टीकरण सादर केलेले आहेत. सदर स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविण्यात आलेल्या शिक्षेत बदल न करता मी दिलीप झळके, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर खालील प्रमाणे आदेश देत आहे.

—: **अंतिम आदेश** :—

पोना/544 रमेश जाधव, यांना मु.पो. अधिनियम, ( शिक्षा व अपील ) 1956 अन्वये कलम 3 मधील तरतुदी नुसार '' **रु. 5000/— आर्थीक दंडाची** '' शिक्षा देण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाने आपण व्यथीत होत असल्यास सदर आदेशाविरुद्ध अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा. मुंबई यांचे कडे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे आंत या कार्यालय मार्फतीने अपील करु शकता.

क्रमांक :— पोअलोना/आस्था—2/पोना—561/कसुरी/2485/2015 नागपूर दिनांक 18/03/2015

—: आदेष :—

कसुरदाराचे नांव :— पोना/561 कलीम शेख
नेमणुकीचे ठिकाण :— रे.पो.स्टे. शेगांव
**कसुरी** :—

सन 2014—2015 मध्ये दिनांक 15.12.2014 ते 17.12.2014 च्या रे.पो.स्टे. शेगांव येथील वार्षीक निरीक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या दप्तर तपासणीत आपल्याकडील तपासावर असलेले खालीलप्रमाणे गुन्हे व मर्गचा तपास प्रलंबित ठेवल्याचे आढळून आले आहे.

01) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 30/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :— दि. 09.07.14 चे 23.00 वा.,
मर्ग दाखल तारीख वेळ :— दि. 09.07.14 चे 23.15 वा.
मयत अतुल सुरेषराव भोयर, वय 30 वर्ष, (अपघाती मृत्यु)

मृतकाचे घटनास्थळ व इन्क्वेस्ट पंचनामा तयार केला आहे. पी.एम. रिपोर्ट दि. 10.07.14 रोजी प्राप्त झाला आहे. ;व्हिसेरा राखीव नाहीद्ध मयताचे वडील नामे सुरेषराव गुलाबराव भोयर, वय 60 वर्ष, धंदा शेती, राह. गौळ, ता. देवळी, जिल्हा वर्धा व पत्नी नामे संध्या अतुल भोयर, वय 22 वर्ष, धंदा घरकाम, राह. ता. देवळी, वर्धा यांचा जबाब घेतलेले आहे परंतु त्या जबाबावर ठिकाण व दिनांक नमुद नाही. के.डा.क्र. 03 दि. 18.07.14 पर्यंत तपास केलेला आहे. त्यानंतर काहीही तपास केलेला नाही.

02) रेपोस्टे शेगांव गु.र.नं. 48/2014 कलम 379 भा.दं.वि.
गुन्हा घडला तारीख वेळ :— दि. 14.10.14 चे 01.00 वा.,
गुन्हा दाखल तारीख वेळ :— दि. 22.10.14 चे 06.30 वा.
घटनास्थळ :— ट्रेन नं. 12139 डा. सेवाग्राम एक्स. चे कोच नं. एस/5 चे बर्थ नं. 66,67,69 व 70 वरुन, रे.स्टे. शेगांव येथुन गाडी सुटताच.
गेला माल :— ट्रॉली बॅग त्यात कपडे, आधार कार्ड व रोख 6,000/— असा एकुण 6,000/—.
मिळाला माल :— निरंक

उपरोक्त गुन्हा रे.स्टे. बडनेरा दि. 14.10.14 रोजी नंबरी गुन्हा दाखल होणेकामी गुन्हयाचे कागदपत्र प्राप्त झाले होते. सदरचा गुन्हा स्टेषन डायरी अंमलदार पोना/544 जाधव यांनी दि. 22.10.14 रोजी दाखल करुन गुन्हयाचा पुढील तपासकामी नमुद पोना यांना दिला आहे. परंतु नमुद पोना यांनी दि. 22.10.14 पासुन सदर गुन्हयात काहीएक तपास न करता एकही केस डायरी लिहिलेली नाही. के.डा.क्र. 1 दि. 22.10.14 डायरी नंतर काहीएक तपास केलेला नाही.

03) रेपोस्टे शेगांव गु.र.नं. 52/2014 कलम 379 भा.दं.वि.
गुन्हा घडला तारीख वेळ :— दि. 06.11.14 चे 00.10 ते 00.03 वा.,
गुन्हा दाखल तारीख वेळ :— दि. 06.11.14 चे 12.30 वा. दरम्यान.
घटनास्थळ :— रे.स्टे. शेगांव बुकींग मुसाफीर खान्यामध्ये.
गेला माल :— एक बॅग त्यात कपडे, नोकिया कं. चा मोबाईल, रोख 600/— असा एकुण 5,000/— चा मुद्देमाल.
मिळाला माल :— दोन शर्ट, बरमुडा, कि. 500/—.

सदर गुन्हयात फिर्यादी यांनी आरोपी नामे विनोद दिगंबर दहातोंडे, वय 38 वर्ष, राह. सोनाळा, ता. मालेगांव, जिल्हा वाषिम यास पकडुन रे.पो.स्टे. ला येवुन लेखी फिर्याद दिले वरुन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर आरोपी एम.सी.आर. मध्ये असुन केस डा. नं. 04 दि. 09.11.14 पावेतो तपास केलेला आहे. तरी सदर गुन्हयातील अटक आरोपीकडे इतर गुन्हयाबाबत विचारपुस करुन रे.पो.स्टे. ला दाखल असलेल्या अष्याप्रकारचे इतर गुन्हयात अटक करणेबाबत काहीएक कारवाई केल्याचे दिसुन येत नाही.

सदर प्रकरणी आपण कर्तव्यावर निष्काळजी, बेजबाबदारपणा, वर्तन केल्याचे दिसून येते. करीता आपल्याला सदरच्या कसूरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) 1956 मधील कलम 3 अन्वये निर्धारीत कोणत्याही शिक्षेस पात्र ठरता. करीता आपणास '' **रु. 5000/– आर्थीक दंडाची**'' शिक्षा करण्याचे योजिले आहे.

उपरोक्त कसूरी बाबत आपले स्पष्टीकरण कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्याचे दिनांकापासून 07 दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. व विहीत मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास आपणास स्पष्टीकरण सादर करावयाचे नाही असे गृहीत धरुन एकतर्फी निर्णय घेवून अंतिम आदेश काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

क्रमांक :– पोअलोना/आस्था–2/अं.आदेश/कसुरी/2484/2015 नागपूर दिनांक 18/03/2015

–: <u>आदेश</u> :–

संदर्भ :– पोअलोना/आस्था–2/पोहवा–647/कसुरी/689/2015, दिनांक 21/01/2015
कसुरदाराचे नांव :– पोहवा/647 असलम पठाण
नेमणुकीचे ठिकाण :– रे.पो.स्टे. शेगांव

**<u>कसुरी</u> :–**

सन 2014–2015 मध्ये दिनांक 15.12.2014 ते 17.12.2014 च्या रे.पो.स्टे. शेगांव येथील वार्षीक निरीक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या दप्तर तपासणीत आपल्याकडील तपासावर असलेले खालीलप्रमाणे गुन्हे व मर्गचा तपास प्रलंबित ठेवल्याचे आढळून आले आहे.

01) रेपोस्टे शेगांव गु.र.नं. 44/2014 कलम 379 भा.दं.वि.
गुन्हा घडला तारीख वेळ :– दि. 11.09.14 चे 05.30 वा.,
गुन्हा दाखल तारीख वेळ :– दि. 16.09.14 चे 11.30 वा.
घटनास्थळ :– ट्रेन नं. 12129 डा. आझादहिंद एक्स. चे कोच नं. बि/1 चे बर्थ नं. 05 ते 06 वरुन, रे.स्टे. शेगांव येथुन गाडी सुरु होताच.
गेला माल :– लेडील पर्स त्यात कॅमेरा, रोख व सॅमसंग कं. चा मोबाईल असा एकुण 30,000/– चा माल.
मिळाला माल :– निरंक

सदर गुन्हयात गुन्हयाचा तपास के.डा.क्र. 09 दि. 13.12.14 पावेतो केलेला असल्याचे दिसुन येते. व त्याबाबत केस डायरी ऑफीस कॉपीसह कागदपत्रात समाविष्ट केलेल्या असुन एकाही केस डायरीवर आपली स्वाक्षरी नाही. सदर गुन्हयात साक्षीदार लोकांचा जाबजबाब घेतले आहे परंतु जबाबावर तारीख व तपासी अंमलदार यांची समक्षची स्वाक्षरी नाही. गुन्हेगार नामे शेख बषीर शेख रषीद, राह. मलकापुर व मोतीलाल मोहन सपकाळे, राह. भुसावळ, राजु बाळकृष्ण षिळे, राह. अकोला व अब्दुल शमी असुल जब्बार, राह. बडनेरा या चारही गुन्हेगारा–यांच्या घरा–या घरझडत्या घेवुन घरझडती पंचनामे कागदपत्रात लावलेले आहे परंतु चारही पंचनाम्यावर ज्या पंचासमक्ष घरझडत्या घेतल्या त्या पंचाचे नांव व स्वाक्ष–या घेतलेल्या नाहीत.

02) रेपोस्टे शेगांव गु.र.क्र. 46/2014 कलम 379 भा.दं.वि.
गुन्हा घडला तारीख वेळ :– दि. 26.09.14 चे 05.05 वा.,
गुन्हा दाखल तारीख वेळ :– दि. 26.09.14
घटनास्थळ :– ट्रेन नं. 12880 अप. भुवनेष्वर एक्सचे कोच नं. ए/1 रे.स्टे. मलकापुर येणेपुर्वी.
गेला माल :– एक लेडीज पर्स त्यात रोख, सोन्याचे दागीने, ॲपल कं. आयफोन कि. 45,000/– असा एकुण 69,300/– चा माल.
मिळाला माल :– निरंक

सदरचा गुन्हा हा रे.पो.स्टे. भुसावळ येथे शुन्य नंबरी दाखल होवुन नंबरी गुन्हा दाखल होणेकामी के. डा.क्र. 01 दि. 26.09.14 रोजी कागदपत्र रे.पो.स्टे. शेगांव येथे प्राप्त झाले. परंतु पोलीस स्टेषनला नमुद प्रमाणे नंबरी गुन्हा दाखल करुन दि. 26.09.14 पासुन एकही केसडायरी कागदपत्रात समाविष्ट नाही.

03) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 46/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :– दि. 24.11.14 चे 01.30 वा.,



मर्ग दाखल तारीख वेळ :– दि. 24.11.14 चे 03.00 वा.

मयत अनओळखी पुरुष वय अंदाजे 35 वर्ष, (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये बिनतारी संदेष, तपास यादया, ब्रॉडकास्ट मेजेस पाठविले आहे. सदर मर्ग मध्ये मृतकाची ओळख पटलेली असुन मृतकाचे नांव मंगेष केषवराव मारोडे, वय 28 वर्षे, राह. पडषी, ता. संग्रमपुर, जिल्हा बुलढाणा असे असुन मृतकाचे नातेवाईकांचे अद्याप पावेतो जाबजबाब घेतलेले नसुन मर्ग मध्ये एकही तपासाची केस डायरी लिहलेली नाही.

04) रेपोस्टे शेगांव गु.र.नं. 54/2014 कलम 379 भा.दं.वि.
गुन्हा घडला तारीख वेळ :– दि. 15.11.14 चे 18.30 वा.,
गुन्हा दाखल तारीख वेळ :– दि. 15.11.14 चे 22.00 वा.
घटनास्थळ :– ट्रेन नं. 18030 अप. शालीमार एक्स. चे समोरील जनरल बोगीत
चढतांना रे.स्टे. शेगांव.
गेला माल :– पॅन्टचे खिषातुन रोख 15,000/–.
मिळाला माल :– निरंक

यातील फिर्यादी हयांनी पो.स्टे. ला येवुन लेखी फिर्याद दिलेवरुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन तपास आपण करीत आहेत. गुन्हयाचे तपासात बिनतारी संदेष, ब्राडकॉस्ट मेसेज, तपास यादया पाठविण्यात आल्या असुन दि. 16.11.14 रोजी के.डा.क्र. 2 मध्ये रे.स्टे. शेगांव येथील वेंडर यांचे जबाब घेतल्याचे लिहीलेले आहे परंतु कागदपत्रात जबाब समाविष्ठ केले नाही तसेच त्याच केस डायरीत रेकॉर्डवरील गुन्हेगाराची घरझडती घेवुन घरझडती पंचनामा कागदोपत्री समाविष्ट केलेला आहे  असे नमुद केले आहे परंतु ते कागदोपत्री पंचनामा समाविष्ठ केलेला नाही, त्यानंतर सदर गुन्हयाचा काहीएक तपास केलेला नाही.

उपरोक्त कसुरी बद्दल '' वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता स्थगीतीची '' या आशयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअलोना/ आस्था–2 /पोहवा–647/कसुरी/689/2015, दि. 21.01.2015 रोजी निर्गमीत करण्यात आली होती. व कारणे दाखवा नोटीस दिनांक 26/01/2015 रोजी स्विकारले. कारणे दाखवा नोटीसमधील कसूरीबाबत आपण दिनांक 31/01/2015 अन्वये मुदतीत स्पष्टीकरण सादर केलेले आहेत. सदर स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविण्यात आलेल्या शिक्षेत बदल न करता मी दिलीप झळके, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर खालील प्रमाणे आदेश देत आहे.

–: अंतिम आदेश :–

पोहवा/647 असलम पठाण, यांना मु.पो. अधिनियम, ( शिक्षा व अपील ) 1956 अन्वये कलम 3 मधील तरतुदी नुसार '' **वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता स्थगितीची** '' शिक्षा देण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाने आपण व्यथीत होत असल्यास सदर आदेशाविरुद्ध अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा. मुंबई यांचे कडे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे आंत या कार्यालय मार्फतीने अपील करु शकता.

क्रमांक :– पोअलोना/आस्था–2/अं.आदेश/कसुरी/2490 /2015 नागपूर दिनांक 18/03/2015

–: आदेश :–

संदर्भ :– का.दा.नो. क्र. पोअलोना/आस्था–2/663 व 1118/कसुरी/100/2015, दिनांक 30.01.2015
कसुरदाराचे नांव :– पोना/663 गणेश पाचपोर
नेमणुकीचे ठिकाण :– रे.पो.स्टे. भूसावळ.

**कसुरी :–**

रे.पो.स्टे. भूसावळ येथे नेमणूकीस असतांना, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर यांचे सन 2014 – 2015 या वर्षाची रे.पो.स्टे. भूसावळ येथील वार्षिक निरीक्षण सुरु असतांना दिनांक 30/01/2015 रोजी किट परेडचे निरीक्षण घेतेवेळी आपण आपसात बोलत असतांना आढळुन आले.

उपरोक्त कसुरी बद्दल '' रु. 500/– आर्थीक दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये '' या आशयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअलोना/ आस्था–2 /663 व 1118/कसुरी/100/2015 नागपूर दिनांक 30/01/2015 रोजी निर्गमीत करण्यात आली होती. व कारणे दाखवा नोटीस दिनांक 30/01/2015 रोजी स्विकारले. परंतु कारणे दाखवा नोटीसमधील कसूरीबाबत आपण अद्यापपावेतो स्पष्टीकरण सादर केलेला नाही. यावरुन आपल्याला काहीच म्हणावयाचे नसुन कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविलेली शिक्षा मान्य असल्याचे दिसते. तरी कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित शिक्षा कायम ठेवुन मी दिलीप झळके, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर खालील प्रमाणे आदेश देत आहे.



–: अंतिम आदेश :–

पोना/663 गणेश पाचपोर, यांना मु.पो. अधिनियम, ( शिक्षा व अपील ) 1956 अन्वये कलम 3 मधील तरतुदी नुसार " **रु. 500/— आर्थीक दंडाची** " शिक्षा देण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाने आपण व्यथीत होत असल्यास सदर आदेशाविरुद्ध अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा. मुंबई यांचे कडे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे आंत या कार्यालय मार्फतीने अपील करु शकता.

क्रमांक :— पोअलोना/आस्था—2/अं.आदेश/कसुरी/2483/2015 नागपूर दिनांक 18/03/2015

—: आदेश :—

संदर्भ :— पोअलोना/आस्था—2/पोहवा—439/कसुरी/686/2015, दिनांक 21/01/2015
कसुरदाराचे नांव :— पोहवा/439 प्रकाश सावळे
नेमणुकीचे ठिकाण :— रे.पो.स्टे. शेगांव

**कसुरी :—**

सन 2014—2015 मध्ये दिनांक 15.12.2014 ते 17.12.2014 च्या रे.पो.स्टे. शेगांव येथील वार्षीक निरीक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या दप्तर तपासणीत आपल्याकडील तपासावर असलेले खालीलप्रमाणे गुन्हे व मर्गचा तपास प्रलंबित ठेवल्याचे आढळून आले आहे.

01) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 10/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :— दि. 27.02.14 चे 21.45 वा.,
मर्ग दाखल तारीख वेळ :— दि. 28.02.14 चे 00.05 वा.
मयत अनओळखी पुरुष वय 60 ते 65 वर्ष, (नैसर्गीक मृत्यु)

सदर मर्ग मध्ये मृतकाचे पी.एम. प्राप्त झाले असुन प्रेताची दफनविधी केली आहे. प्रेताजवळ मोबाईल नं. 9049587030 ची चिठ्ठी मिळाली होती. त्या नंबरवर संपर्क केला असता त्याने आपले नांव गजानन दुबे, राह. धामनगांव रेल्वे असे सांगितले. सदर मर्गमध्ये दि. 28.02.14 रोजी बिनतारी संदेष व ब्राडकास्ट मॅसेज पाठविले. परंतु त्या दिवसापासुन आजपर्यंत अनओळखी मृतकाचे शोध घेणेसाठी काहीही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर मर्गचे तपासाची एकही केस डायरी लिहलेली नाही, परंतु सदर मर्ग मध्ये मृतकाचा व्हिसेरा केमीकल ॲनलायझर ऑफिसला तपासणीसाठी पाठविलेला नाही. सदर मर्ग मध्ये मृतकाचा व्हिसेरा सी.ए. ऑफीसमध्ये पाठविला नाही तसेच मृतकाचे नातेवाईकाचा शोध घेणेकामी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसुन आलेले नाही.

02) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 18/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :— दि. 02.04.14 चे 10.00 वा.
मर्ग दाखल तारीख वेळ :— दि. 02.04.14 चे 13.30 वा.
मयत नामे सौ. ललीता महादेव खरप, वय 30 वर्षे, राह. नागझरी वार्ड नं. 1 तालुका शेगांव, जिल्हा बुलढाणा (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये दि. 02.04.14 रोजी पी.एम. अहवाल प्राप्त झाला आहे. मर्ग मध्ये के.डा.क्र. 3 दि. 05.06.14 नंतर डायरी लिहली नाही, त्यानंतर काहीएक तपास केलेला नाही.

03) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 24/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :— दि. 21.05.14 चे 21.10 वा.
मर्ग दाखल तारीख वेळ :— दि. 21.05.14 चे 21.45 वा.
मयत नामे जगदीष ज्ञानदेव नाफडे (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये दि. 21.05.14 रोजी डायरी अंमलदार पोहवा/920 लढे यांनी मर्ग दाखल करुन पोहवा/439 सावळ यांचेकडे मर्गचा तपास दिला परंतु त्यांनी आजपर्यंत अनओळखी मयताचे नातेवाईकांचा शोध घेणेकामी काहीही प्रयत्न केलेले नाही अथवा मर्गचा काहीही तपास केलेला नाही. (दि. 22.05.14 रोजी पी.एम. रिपोर्ट प्राप्त झालेले आहे.)

सदर मर्ग मध्ये मृतकाची ओळख पटलेली असुनही मृतकाच्या एकाही नातेवाईकांचा जबाब नोंदविलेला नाही. प्रेत हे मृतकाचे मुलाला दिल्याबाबत सांगत आहे, परंतु मर्गचे कागदपत्रात प्रेत कोणाच्या ताब्यात दिले याबाबत प्रेत ताब्यात दिल्याची पोच पावती नाही.

04) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 27/2014 कलम 174 सिआरपीसी,
मर्ग घडला तारीख वेळ :— दि. 25.06.14 चे 22.00 वा.
मर्ग दाखल तारीख वेळ :— दि. 25.06.14 चे 23.45 वा.
मयत नामे ज्योती अविराज विष्वकर्मा, वय 22 वर्ष, राह. कांदीवली, मुंबई (अपघात मृत्यु)



सदर मर्ग मध्ये दि. 27.06.14 रोजी पी.एम. प्राप्त झाले आहे. सदर मर्गचा के.डा.क्र. 01 दि. 25.06.14 पर्यंत तपासानंतर काहीएक तपास केलेला नाही. मृतकाची ओळख पटलेली असुनही मृतकाच्या एकाही नातेवाईकांचा

जाबजबाब घेतलेले नाही. दि. 27.06.14 रोजी यातील मृतकाची आई पुष्पा अविराज विष्वकर्मा, व मृतकाचे मामा विषाल मुलचंद यांनी रे.पो.स्टे. ला येऊन प्रेत ओळखले आहे त्याचे त्याच दिवषी जबाब घ्यावयास पाहीजे होते परंतु त्याचे त्या दिवषी जबाब घेतले नाही.

05) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 31/2014 कलम 174 सिआरपीसी,

मर्ग घडला तारीख वेळ :– दि. 19.07.14 चे 11.30 वा.

मर्ग दाखल तारीख वेळ :– दि. 19.07.14 चे 11.55 वा.

मयत नामे विक्की सुखदेव नाटेकर, वय 14 वर्षे, राह. खामगांव, रे.स्टे. खामगांव, माल धक्यावरील इलेक्ट्रीक पोल अंगावर पडल्याने (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये खामगांव शहर बुलढाणा येथे दि. 19.07.14 रोजी शुन्य नंबरी मर्ग दाखल करुन आलेल्या 1 नंबर डायरीनंतर एकही मर्गची केस डायरी लिहीलेली नाही. दि. 19.07.14 रोजी पी.एम. अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर मर्गचा काहीही तपास केलेला नाही. मृतकाचे एकाही नातेवाईकाचे जबाब नोंदविलेले नाही.

06) रेपोस्टे शेगांव मर्ग क्र. 34/2014 कलम 174 सिआरपीसी,

मर्ग घडला तारीख वेळ :– दि. 11.08.14 चे 14.45 वा.

मर्ग दाखल तारीख वेळ :– दि. 11.08.14 चे 15.30 वा.

मयत नामे शेख अनवर शेख मेहबुब उलहक, वय 42 वर्षे, राह. बेबी कॉम्पलेक्स नांदुरा, (अपघाती मृत्यु)

सदर मर्ग मध्ये दि. 11.08.14 रोजी डायरी अंमलदार पोहवा/405 उपाध्याय यांनी के.डा.नं. 1 प्रमाणे पुढील तपासकामी सदर मर्गचा तपास पोहवा/439 सावळे यांचेकडे दिला आहे,
परंतु तेव्हा पासुन त्यांनी मर्गचा काहीएक तपास केलेला नाही व एकही केस डायरी लिहलेली नाही. सदर मर्गमध्ये पी. एम. अहवाल दि. 11.08.14 रोजी प्राप्त झालेला आहे. सदर मर्गमध्ये प्रेताचा घटनास्थळाचा व इन्क्वेस्ट पंचनामा व्यतिरीक्त काहीही कागदपत्र दिसुन येत नाही. सदर मर्ग मध्ये मृतकाची ओळख पटलेली असुन अद्याप पर्यंत एकाही नातेवाईकांचे जाबजबाब नोंदविलेले नाही.

07) रेपोस्टे शेगांव गु.र.नं. 53/2014 कलम 379 भा.दं.वि.

गुन्हा घडला तारीख वेळ :– दि. 05.11.14 चे 00.30 वा.,

गुन्हा दाखल तारीख वेळ :– दि. 09.11.14 चे 18.30 वा.

घटनास्थळ – ट्रेन नं. 12139 मुंबई–नागपुर सेवाग्राम एक्स. चे कोच नं. एस/9 चे बर्थ नं. 25,26 व 28 वरुन रे.स्टे. मलकापुर येथुन गाडी सुटताच.

गेला माल – एक लेडीज पर्स त्यात रोख 3,000/– , दोन मोबाईल असा एकुण 10,300/– चा माल.

मिळाला माल – निरंक

सदरचा गुन्हा हा रे.पो.स्टे. नागपुर येथुन शुन्य नंबरीने नंबरी दाखल होणेकामी दि. 09.11.2014 रोजी आल्याने पोना/1028 खांडेकर यांनी गुन्हा नंबरी दाखल करुन त्याच दिवषी गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/439 सावळे यांना दिला आहे, परंतु त्यांनी काहीही तपास केलेला नसुन तपासाची एकही केस डायरी लिहलेली नाही. फिर्यादी माधवी श्रीपाद अवधुत, वय 40 वर्ष, राह. रामेष्वरी, नागपूर यांनी चोरीस गेलेला मोबाईलचा आय.एम.ई.आय. नंबर दिलेले आहे परंतु तपासी अंमलदार यांनी अद्यापपावेतो मोबाईल ट्रेसिंगकामी रिपोर्ट पाठविलेला नाही.

उपरोक्त कसुरी बद्दल '' वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता स्थगीतीची '' या आशयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअलोना/ आस्था–2 /पोहवा–439/कसुरी/686/2015, दि. 21.01.2015 रोजी निर्गमीत करण्यात आली होती. व कारणे दाखवा नोटीस दिनांक 24/01/2015 रोजी स्विकारले. कारणे दाखवा नोटीसमधील कसूरीबाबत आपण दिनांक 27/01/2015 अन्वये मुदतीत स्पष्टीकरण सादर केलेले आहेत. सदर स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविण्यात आलेल्या शिक्षेत बदल न करता मी दिलीप झळके, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर खालील प्रमाणे आदेश देत आहे.

### –: अंतिम आदेश :–

पोहवा/439 प्रकाश सावळे, यांना मु.पो. अधिनियम, ( शिक्षा व अपील ) 1956 अन्वये कलम 3 मधील तरतुदी नुसार '' **वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता स्थगितीची** '' शिक्षा देण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाने आपण व्यथीत होत असल्यास सदर आदेशाविरुद्ध अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा. मुंबई यांचे कडे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे आंत या कार्यालय मार्फतीने अपील करु शकता.



## भाग – 7

## सेवानिवृत्त

क्रमांक : पोअलोना / आलि / निवसेनि / 2474 / 2015 नागपूर दिनांक 17 / 03 / 2015

**–: आदेश :–**

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना दिनांक 31 / 03 / 2015 रोजी वयाची 58 वर्ष पुर्ण होत असल्याने त्यांना दि. 31 / 03 / 2015 रोजी माध्यान्हानंतर नियम वयोमानाने सेवानिवृत्त करण्यात येत आहे

| अ.क्र | पेलीस कर्मचाऱ्यांचा हुददा ब. व नाव | नेमणुक | नियत वयोमानाने सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | सफौ / 710 निलकट तांबळे | रे.पो.स्टे अकोला | दिनांक 31 / 03 / 2015 |

**भाग – 8**

**मयत**

क्रमांक : पोअलोना / आस्था / सफौ–594 / मयत / 2015 2501 नागपूर दिनांक 19 / 03 / 2015

**–: आदेश :–**

सफौ / 594 भारत नारायण मेश्राम, नेमणुक बीडीडीएस लोहमार्ग, नागपुर यांचा दि. 17 / 03 / 2015 रोजी 02. 30 वा औषधोपचारा दरम्यान इटकेलवार रुग्णालय नागपुर येथे मृत्यु झाल्याने त्यांचे नाव दिनांक 17 / 03 / 2015 चे मा. नंतर पासुन लोहमार्ग, नागपुर जिल्हयाच्या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

क्रमांक : पोअलोना / आस्था / पोहवा–61 / मयत / 2015 2420 नागपूर दिनांक 16 / 03 / 2015

**–: आदेश :–**

पोहवा / 61 दिलीप रामकृष्णा पाटील, नेमणुक रे.पो.स्टे अकोला यांचा दि. 13 / 03 / 2015 रोजी 23.20 वा किडणीचे आजाराने भुसावळ येथे मृत्यु झाल्याने त्यांचे नाव दिनांक 14 / 03 / 2015 चे मा. नंतर पुर्वी पासुन लोहमार्ग, नागपुर जिल्हयाच्या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

स्वाक्षरी

( दिलीप झळके )
पोलीस अधिक्षक,लोहमार्ग,
नागपुर

प्रति :– ठाणेदार सर्व नागपूर लोहमार्ग जिल्हा

प्रत माहीतीस : अपर पोलीस अधिक्षक लोहमार्ग नागपूर / सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी लोहमार्ग नागपूर / मनमाड / जालना

प्रभारी अधिकारी :– स्था.गु.शा. नागपूर / भुसावळ / वाचक शाखा / जि.व्ही.शाखा / पो.नी कक्ष, रा.पो.नी पोलीस मुख्यालय / मोटार परिवहन विभाग श्वॉन पथक / बी.डी.डी.एस. कार्यालय अधिक्षक / पत्र व्यवहार शाखा / लेखा शाखा / आस्थापना शाखा / पत्रव्यवहार लीपीक–1,5 / बि.सं. विभाग कार्यालय पोलीस अधिक्षक लोहमार्ग नागपुर